
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2018
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठ अंतर्गत प्रवेश पूर्व परीक्षा सुरळीत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत विद्यापीठ व संलग्नित अभियांत्रिकी महाविद्यालयाची शैक्षणिक वर्ष २०१८–१९ साठीची ऑनलाईन प्रवेश पूर्व परीक्षा कोल्हापूर, सांगली, सातारा या तिन्ही जिल्ह्यातील २४ परीक्षा केंद्रावर सुरळीत पार पडली. या परीक्षेला तिन्ही जिल्ह्यातून २२ ते २९ मे या कालावधीत ११ हजार ४६५ विद्यार्थ्यांपैकी १० हजार २६१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली, तर १ हजार २०४ विद्यार्थी गैरहजर होते, अशी माहिती परीक्षा विभागातर्फे देण्यात आली.

विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली व सातारा या तिन्ही जिल्ह्यात परीक्षा झाली. यामध्ये डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी (कसबा बावडा, कोल्हापूर), भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (मोरेवाडी, कोल्हापूर), डॉ. जे. जे. मगदूम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग(जयसिंगपूर, कोल्हापूर), डॉ. दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (बनवाडी, ता. कराड, जि. सातारा), कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड पॉलीटेक्नीक



(सीएएमपी, सातारा), कोल्हापूर इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (करवीर, कोल्हापूर), राजारामबापू इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी(राजाराम नगर, साखराळे, ता. वाळवा, जि. सांगली),तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी (वारणानगर, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर), अंबाबाई तालीम संस्था संजय भोकरे कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी (मिरज), डिपार्टमेंट ऑफ कॉम्प्युटर सायन्स (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), यासह अन्य परीक्षा केंद्रावर ३८ विषयांसाठीची प्रवेशपुर्व परीक्षा सुरळीत पार पडली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2018
तरुण भारत

# संतोष सुतार यांना पीएच. डी.

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट विभागाचे साहाय्यक प्रा. संतोष सुतार यांना पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील संख्याशास्त्र विषयाची पीएच. डी. पदवी प्रदान करण्यात आली. त्यांनी 'मॉडेलिंग ॲनॅलिसिस ऑफ लोड शेरिंग फेनोमेनॉन" या विषयावर शोधप्रबंध सादर करण्यात आला. या विषयासाठी त्यांना पुणे येथील सावित्रीबाई फुले विद्यापीठातील संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. टी. व्ही. रामनाथन आदींचे मार्गदर्शन लाभले. तसेच डॉ. यू. व्ही. नाईक–निंबाळकर, डॉ. ईशा दिवाण, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. एन. काशीद, डॉ. एच. व्ही. कुलकर्णी, डॉ. माणिक आवळे, डॉ. आकांक्षा काशीकर आदींचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 MAY 2018
महाराष्ट्र टाईम्स



रोबोटिक्स कार्यशाळेतील विद्यार्थांना सहभाग प्रमाणपत्र देताना कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता. सोबत प्राचार्य महादेव नरके, प्रा. नितीन माळी, प्रा. शशांक सूर्यवंशी, अनिल देशिंगे आदी.

# 'विद्यार्थ्यांनी नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासक्रमाबरोबर रोबोटिक्ससारखे नवे तंत्रज्ञान आत्मसात करावे, असे प्रतिपादन डॉ. डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी केले. डॉ. डी. वाय. पाटील पॉलिटेक्निकमध्ये आयोजित करण्यात आलेल्या रोबोटिक्स कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी प्राचार्य महादेव नरके उपस्थित होते.

डॉ. ए. के. गुप्ता पुढे म्हणाले, 'सध्याच्या काळात औद्योगिक क्षेत्रात नवतंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. यामध्ये रोबोटिक्स तंत्राचा वापर हा अतिशय महत्त्वपूर्ण ठरत आहे. त्यामुळे ही कार्यशाळा विद्यार्थांसाठी उपयुक्त ठरेल. कार्यशाळेत प्रा. नितीन माळी आणि प्रा. शशांक सूर्यवंशी यांनी विद्यार्थ्यांना पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनद्वारे रोबोटिक्स तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली.

या कार्यशाळेमध्ये १० उत्तीर्ण झालेल्या १३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांचे छोटे गट करून रोबोट स्वतः जोडणे, सर्किट जोडणे, रोबोट ऑपरेट करणे याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. डॉ. ए. के. गुप्ता यांच्या हस्ते विद्यार्थांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले.